



पुस्तकांची अजब दुनिया

सॅम्युएल इबाएल

नेहरू बाल पुस्तकालय–64

पुस्तकांची अजब दुनिया

लेखक
सॅम्युएल इझाएल
अनुवाद
सौ. नलिनी नाईक

६६६५



नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली

अबिगैल, अफ्रीन, अवीन्हा,
अनिता, अंजली, लिन,
मौरीस, मीनल, राखेल,
एलिझाबेथ, साराहा, ज्युलिएट,
शहरियार, सिमॉन, यायेल,
झिल्का आणि झिम्रा,
यांचे साठी.....

ऋणनिर्देश

टी. एस. सत्यन्, पृष्ठ 1
गुरुदियालसिंग, पृष्ठ 4–5
कपिला वात्सायन, पृष्ठ 8
पुरावस्तु सर्वेक्षण, पृष्ठ 9, 10
नॅशनल म्युझियम, पृष्ठ 10, 13, 17, 21
युनेस्को कूरियर, पृष्ठ 12, 18–19, 23
ज्युइश वेल्फेयर असोसिएशन, नवी दिल्ली, पृष्ठ 16
हर्बर्ट कॅगेरर, पृष्ठ 22
इंद्रप्रस्थ प्रेस, पृष्ठ 26, 35, 36, 42
थॉम्सन प्रेस, पृष्ठ 28–29, 34, 37, 40–41, 48
पी. एन्. अहुजा, पृष्ठ 32, 54–55
अभिनव पब्लिकेशन्स, पृष्ठ 51
मोना चौधरी, पृष्ठ 58
मॉडर्न स्कूल, पृष्ठ 60–61
नॅशनल लायब्ररी, पृष्ठ 62

1982 (शके 1904)

मूळ हक्क : सॅम्युएल इझ्राएल 1980
मराठी अनुवादाचा हक्क :
नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली

मूल्य 2.50

प्रकाशक :
संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
ए–५, ग्रीनपार्क, नवी दिल्ली 110016

मुद्रक
मधुसूदन बनहट्टी,
नारायण मुद्रणालय,
धनतोली, नागपूर–४४० ०१२



४४४६

पुस्तकांची अजब दुनिया

पुस्तकं अनेक प्रकारची असतात. चित्रकलेची पुस्तकं, पाठ्यपुस्तकं, सचित्र पुस्तकं, जमाखर्चाची पुस्तकं, गोष्टीची पुस्तकं, व्यंगचित्रांची पुस्तकं, गृहपाठाच्या वह्या, साध्या वह्या, रोजनिशी. ह्याशिवाय अनेक विषयांवरची पुस्तकं असतात. जशी इतिहास, भूगोल, गणित, रसायन, अंतराळ प्रवास, संशोधन, निसर्ग, ज्योतिष, पाककला, फुटबॉल, क्रिकेट, गिर्यारोहण इत्यादी ! थोडक्यात म्हणजे पुस्तकाला विषयाचं बंधन नाही. एवढंच कशाला, 'पुस्तक' हा देखील पुस्तकाचा विषय होऊ शकतो–हे सुद्धा एक त्यातलंच पुस्तक आहे.

जाड पुठ्ठ्याच्या बांधणीचा तुमचा शब्दकोष घ्या, मित्रांकडून उसनं मागून आणलेलं गुळगुळीत चकचकीत मुखपृष्ठाचं व्यंगचित्राचं पुस्तक बघा, पुठ्ठ्याचं आवरण असलेलं इतिहासाचं पुस्तक घ्या, मग तुमच्या लक्षात येईल की, काही पुस्तकं दोऱ्यांनी शिवलेली असतात, तर काही ह्या पुस्तकासारखीच तारेने बांधलेली असतात. तुमच्या जवळच्या पुस्तकाकडे

विद्यार्थी ग्रंथालय
न्यू इंग्लिश स्कूल, टि० रो
पुणे ४११०३०

सहज एक नजर टाकली तर कागद, शाई व पुठ्ठा ह्या वस्तूंची पुस्तक तयार करायला जरूरी असते, हे तुमच्या लक्षात येईल. जरा निरखून बघितलं तर, डिंक व दोऱ्याचीही गरज आहे हे समजतं. कुशल कारागीर हे सर्व हाताने किंवा यंत्राच्या साहाय्याने एकत्र करतात. हे सर्व छापखान्यात किंवा बायंडरीजमध्ये होतं. (ज्या कारखान्यात छापलेले कागद मुख-पृष्ठासहित योग्य रीतीने एकत्र ठेवून बांधली जातात.)

वह्या आणि चित्रकलेची पुस्तकं ह्यांची गोष्टच सोडून द्या ! पण इतर कुठल्याही पुस्तकाची सुरुवात ही लेखकांच्या कल्पनेतून, किंवा कला-काराच्या भावनेतून, किंवा ह्या दोन्हीच्या संगमातून झालेली आढळते. म्हणून सुरवातीपासूनच सुरवात करू या !

ही गुरुग्रंथसाहेबाची हस्तलिखित प्रत. अमृतसर येथील सुवर्ण मंदिरातील लांबीने सर्वात मोठी असणारी जगातील एकमेव प्रत.

बोलकी पुस्तके

लोक पुस्तकं लिहितात तरी कां व कशाला ? तर पुष्कळदा आपल्याला आलेला गंमतीदार अनुभव, एखादी चांगली व महत्त्वाची गोष्ट इतरांना सांगाविशी वाटते म्हणून ! दुसरे लोक त्याच्याशी सहमत होवोत वा न होवोत, पण हा अनुभव आपल्या बरोबर नाहीसा होऊ नये अशी त्यांची इच्छा असते. आपल्या सभोवती असणाऱ्या व्यक्तींशिवाय, इतरांनाही ह्या अनुभवाचा फायदा व आनंद मिळावा, असं त्यांना वाटत असतं.

इतरांना अनुभव सांगण्याची प्रबळ इच्छा असणाऱ्यांना, सहा सात हजार वर्षांपूर्वी, संभाषणाशिवाय दुसरं साधनच नव्हतं ! त्यावेळेला लिहिणं माहीत नव्हतं आणि असलंच तर फार प्राथमिक स्वरूपात होतं. महान् विचारवंत, शिक्षक, गोष्टी सांगणारे (प्रवचनकार–कथाकार लोक जागोजागी भटकून, आपले विचार व्यक्त करीत, गोष्टी सांगत किंवा लोक त्यांच्यापाशी येऊन ऐकत.) निष्ठावान् शिष्य आपल्या गुरुंनी सांगितलेले विचार मुखोद्गत करून त्याचा प्रसार करत. बऱ्याच वेळा ही शिकवण किंवा ह्या गोष्टी काव्य रूपाने सांगितल्या जायच्या. ज्याला आपण खंड-काव्य म्हणतो. ह्या काव्यरचनेमुळे गोष्टी आठवायलाही सोप्या जायच्या नी ऐकायलाही रंजक वाटायच्या !

वेद, गीता, रामायण आणि इतर प्राचीन वाङ्मय लिहून होण्यापूर्वी शेकडो वर्षं, पिढ्यान् पिढ्या अशाच रीतीने जतन केले गेले. गौतम बुद्ध व महावीर ह्यांच्या शिकवणूकीचा भारतवर्षभर प्रसार अशाच पद्धतीने झाला. बौद्ध धर्माचा प्रसार तर चीन, जपान व मध्य आशिया इतक्या दूरवर झाला होता.

आपल्या देशात अजुनही ग्रामीण भागात ह्याच पद्धतीने वाङ्मय प्रसार होतो. रामायण, गीता, महाभारतातील कथा ह्या फिरणाऱ्या कीर्तनकारांकडून किंवा हरदासाकडून ह्याच पद्धतीने आजही सांगितल्या जातात. आपल्याकडे असे भटके कथाकार अजूनही आहेत. (त्यांच्या बोली भाषेला लिपीच नाही.)

भारतातील मौखिक पद्धत.

आपल्या देशातच काय पण आशिया, आफ्रिका खंडांतील काही भागात अशा कित्येक जमाती आहेत की ज्या आपली संस्कृती, विचार-धारणा, विद्वत्ता, चालीरीती, कायदा, समजुती आणि लोककथा हे सर्व जतन करण्यासाठी पुस्तकांवर आजही अवलंबून नाहीत. पूर्वजांच्या संस्कृतीचा ठेवा जपून ठेवण्यासाठी ते पाठांतराचा अवलंब करतात. परंतु ह्या परिस्थितीत झपाट्याने बदल होत आहे.

अद्यापही भटक्या कथाकारांची परंपरा चालू आहे.



लिहिलेली पुस्तकं

लिपीच्या शोधाने वाङ्मयप्रसार सोपा झाला. लोकांना जे इतरांना सांगायचं होतं, ते लिहिलं गेलं किंवा लिहून घेतलं गेलं. अशा रीतीने हे लिखाण भविष्यकालासाठी जतन केलं गेलं व वाचण्यासाठी लोकांना मिळू लागलं. परंतु, आता असा प्रश्न आला की, लिहिण्यास सुलभ व दुसऱ्याला सहज देता येतील अशा वस्तू त्यांना मिळेनात ! कारण अजूनपर्यंत जगाच्या बऱ्याच भागात कागदाचा शोधच लागला नव्हता.

एकदा लिहिलं की त्याचीच पुन:पुन्हा नक्कल करावी लागत असे. अनेक ठिकाणी सापडलेले अशोक-कालीन कोरलेले शिलालेख व खोदलेले स्तंभलेख हे ह्याचंच एक उदाहरण आहे.



अशोकाचा एक स्तंभ. खालच्या बाजूला एक लेख खोदलेला. आता काहीसा पुसट झाला आहे.

अशोकाच्या शिलालेखातील एक भाग.



दिल्लीच्या नॅशनल म्युझियममधील संग्रहात असलेला ताम्रपत्रावरील लेख ताम्रपट बांधण्याची सारखीच पद्धत दिसते.

न्यू इंग्लिश स्कूल, टि०
पुणे ४११०३०

तांब्याचा शोध लागल्यावर आजकालच्या तारांच्या, स्प्रिंगसारख्या वेटोळ्यांनी बांधलेल्या पुस्तकांप्रमाणे, कड्यांनी बांधलेल्या ताम्रपटांचा, महत्त्वाचे दस्तऐवज व कागदपत्र लिहिण्यासाठी उपयोग केला जाऊ लागला ताम्रपटाच्या दोन्ही बाजूला अक्षर कोरता येत असे.

पण दगडांवर किंवा धातुंवर लिहिणं काही तसं सोपं नव्हतं. कुशल लोकच शिलालेख खोदू शकत व ताम्रपटांवर कोरू शकत! शाई व रंग पुसट होतात म्हणून त्याचा उपयोग करता येत नव्हता. धूळपाटीवर लिहिणं त्यांना सोपं जायचं. लिहिलेला मजकूर कायम राहावा म्हणून अशा धूळ-पाट्या भट्टीत भाजत. संपूर्ण पुस्तकंची पुस्तकं अशी लिहिली गेली व जतन केली गेली. इराकमध्ये युफ्राटीस व टायग्रीस नद्यांच्या खोऱ्यात, पृष्ठ क्रमांक असलेल्या ३० हजार धूळपाट्यांच्या पुस्तकांचं एक संपूर्ण वाचनालय सापडलं. हे वाचनालय, २५ हजार वर्षांपूर्वी ह्या भागात राज्य करणाऱ्या आशुर्बानीपाल ह्या राजानं स्थापलं होतं. पण अशा धूळपाट्या वाचकाला, किंवा लेखकाला वापरायला सोयीच्या नव्हत्या. अशा सुमारे १०० धूळ-पाट्या टेबलावर ठेवणं किंवा शाळेला नेणं किती जिकिरीचं झालं असतं, ह्याची नुसती कल्पनाच करून बघा! भारतात मात्र, झाडांच्या पानावर, सालींवर, प्राण्यांच्या कातडीवर किंवा कापडावर लिहून, ह्या अडचणीवर मात करण्यात आली. कपड्यावर शाई पसरायची व पटकन् वाळायचीही नाही म्हणून कापडावर लिहिणं सोयीचं पडत नव्हतं.

भारतात, कागद मिळण्यापूर्वी, पुस्तक लिहिण्यासाठी व त्याच्या नकला करण्यासाठी भूर्जपत्रांचा वापर जास्त प्रचलित होता. ४०० ते ५०० वर्षां-पूर्वी पर्यंत, कागद मिळू लागल्यावरही, ह्या भूर्जपत्रांवर पुस्तकं लिहिली जायची. ही अशा तऱ्हेची भूर्जपत्रांची पुस्तकं, संग्रहालय, वाचनालय व खाजगी संग्रहालयात आजही पहायला मिळतात.

अशा भूर्जपत्रांच्या पुस्तकांमुळे लिखाण जतन होऊन, पूर्वीपेक्षा बऱ्याच लोकांना मिळत असलं तरी, त्यांची संख्या मर्यादितच होती. प्रत्येक पुस्तकाची प्रत, हाताने मोठ्या मेहनतीने लिहावी लागत असल्यामुळे, पुस्तकं नुसती

दुर्मिळच नव्हती, तर महागही असायची ! कागदाचा प्रसार झाल्यावरही, हाताने लिहून पुस्तकाची प्रत काढणं कठीणच जायचं आणि म्हणून पुस्तकं कमी व महाग असायची !

इ. स. पू. २००० वर्षापूर्वीचा मृत्तिका स्तंभ.



पुणे ४११०३०

पुस्तकच वाचायला मिळत नसल्याने, पुष्कळ लोकांना साक्षरतेचं महत्त्वच वाटत नव्हतं. पुस्तक मिळण्याची शक्यता नसल्यामुळे वाचनाचीही निकड भासत नसे ! बरं, वाचायला येऊनही, सराव नसल्यामुळे ते अक्षर ओळख विसरूनही जायचे ! आणि म्हणून ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी, त्यांना कथनावरच अवलंबून राहावं लागे. अशा परिस्थितीत प्रगतीचा वेग स्वाभाविकच मंद होता.

नॅशनल म्युझियम, दिल्ली येथील संग्रहातील एक भूर्जपत्रावरील लेख.
खालचे पान : वाचनासाठी उघडून ठेवलेले.
पुस्तक बांधणीची पद्धत कशी आहे, पहा.
पुस्तक कसे बंद केले जाते व सुरक्षित ठेवले जाते.





पुस्तकाची हस्तलिखित प्रत तयार होत आहे.

डावीकडील वरचे चित्र : प्राचीन इजिप्तमध्ये पॅपिरसचा उपयोग लिखाणासाठी होत असे.

उजवीकडील वरचे चित्र : प्राचीन ग्रीस किंवा रोममधील एक गुलाम पुस्तकाचे हस्तलिखित लिहिण्यासाठी बसलेला. तोंडी सांगितला जाणारा मजकूर लिहून घेत आहे.

खालचे डावीकडील चित्र : भारतात भूर्जपत्राचा उपयोग केला जात असे.

खालचे उजवीकडील चित्र : युरोपमध्ये मुद्रणकला अस्तित्वात येण्यापूर्वी संन्यास ग्रंथाच्या प्रती करीत असत.

न्यू इंग्लिश स्कूल, टि
पुणे ४११०३०.

पॅपिरस

नाईल नदीच्या काठावरील, दलदलीत उगवणाऱ्या बांबूच्या देठाच्या सालापासून, कागद तयार करण्याचा शोध, इजिप्शियन लोकांनी सुमारे ५-६ हजार वर्षांपूर्वी लावला. ह्या बांबुच्या झाडाला पॅपिरस म्हणतात. त्यावरूनच पेपर हा शब्द प्रचारात आला. ज्याला पॅपिरस् समजलं जातं, ते म्हणजे धारदार सुरीने बाबूंच्या सालीच्या केलेल्या चपटया पट्टया ! ह्या पट्टया दोन दगडांमध्ये डिंकासारखा चिकट द्रव्य लावून ठेवीत. अशा पट्टयांचे दोन थर, दगडाखाली दाबून ठेवीत. ह्या पट्टया वाळल्या की शंख, दगड किंवा हाडं ह्याच्या सहाय्याने, त्याचा पृष्ठभाग गुळगुळीत करीत.

इजिप्तमधून, भूमध्य समुद्रालगतच्या देशात व दूरवरही पॅपिरस्ची निर्मीती व्हायची. पण पुरवठा मर्यादित होता व निर्यातीवर बंधनेही घातली

प्राचीन इजिप्तमध्ये पॅपिरस तयार करीत आहेत.



जामची आणि मग ह्यासाठी, चर्मपटाचा पर्याय, युरोप व अरब देशांनी शोधून काढला. प्राण्यांची कातडी विशिष्ट प्रकारे कमावून लिहिण्याजोगी केली जात असे.

हजारो वर्षांपूर्वी लिहून ठेवलेल्या चर्मपटांच्या गुंडाळ्या आजही आपल्याला पहायला मिळतात. प्राचीन हिब्रु भाषेत लिहिलेल्या बायबलचे काही चर्मपटांचे तुकडे १९४७ साली मृत समुद्राकाठच्या इस्राएल ह्या देशात सापडले. हा चर्मपट दोन हजार वर्षांपूर्वीचा असावा असा भूगर्भ शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. त्यावर लिहिलेली अक्षरं आजही स्पष्ट दिसतात.



दिल्ली सिनेगॉग (यहुदी लोकांचे पूजास्थान) मधील एक आधुनिक काळातील गुंडाळी पुस्तक. प्राचीन हिब्रू भाषेत ग्रंथ लिहिलेला आहे. बायबलमधील एक उतारा. (कायद्याचे पुस्तक)

विद्यार्थी ग्रंथालय
न्यू इंग्लिश स्कूल, टि...
पुणे ४११०३०

प्राचीन काळी ग्रीक व रोममध्ये बहुतेक सारी पुस्तकं अशी पॅपिरस्-वर किंवा चर्मपटावर लिहिलेली आहेत. तोंडी सांगितलेला मजकुर विद्यार्थी जसा लिहून घेतात, त्या प्रमाणे शिक्षित गुलामांकडून ही पुस्तकं लिहून घेतली गेली व त्याच्या एकाच वेळी अनेक प्रती तयार केल्या गेल्या. मेणाच्या किंवा लाखेच्या चिपांवर सुरीने कोरून अक्षरं लिहिली जायची. चित्रात दाखवल्याप्रमाणे, ह्या चिपा पुस्तकांच्या पानासारख्या जोडून ठेवीत. आता आपण वाचताना पुस्तकाची पानं उलटतो, तसं न करता पान नं. १४ व १६ वरील चित्रात दाखवल्याप्रमाणे चर्मपटांची दोन टोकं, एका

उत्कृष्टपणे सजावट केलेली, पर्शियन भाषेतील रामायणाची प्रत. मोगल सम्राटाच्या आज्ञेवरून तयार केलेली.

दांड्याला गुंडाळून ठेवून वाचायचा मजकुर मध्यभागी येईल, अशा पद्धतीने दांडा फिरवला जायचा.

कागद

कागदाचा व छपाईचा शोध लागल्यावर, आपण ज्याला पुस्तक म्हणतो, ते तयार झालं. आपल्या शेजारच्या देशात चीनमध्ये हे दोन्ही शोध दोन हजार वर्षांपूर्वी लागले.

लाकडाचे गुळगुळीत केलेले व वाळवलेले तुकडे, चिंध्याचा लगदा ह्यांनी तयार होणाऱ्या आजच्या कागदासारखाच प्राचीन चीनमधला कागद होता. कच्चा माल पाण्यात भिजवून, यंत्राच्या सहाय्याने किंवा रासायनिक क्रियेने, कागद तयार करण्यासाठी त्याचा लगदा केला जाई. प्राचीन चीनमध्ये हे यांत्रिक पद्धतीने होत असे.

रासायनिक प्रक्रियेने किंवा लाकडाच्या कुटलेल्या धलपीचे किंवा कापसाच्या तंतूचे छोटे छोटे तुकडे करत. लगदा तयार झाल्यावर, तळाशी तलम कापड असलेला ट्रे लगद्यावर ठेवला जाई. ट्रे उचलल्यानंतर, तलम कापडावर लगद्याच्या थरातील पाणी निथळून गेल्यावर, जो थर तयार होई – तो वाळला की कागद तयार होई.

चीनमधील कागद बनविण्याच्या पाच अवस्था. इ. स. १६३७ मध्ये चिनी भाषेत छापल्या गेलेल्या पुस्तकातून.



इ. स. ७ व्या शतकात भारतात कागद तयार होऊ लागला असं म्हणतात. ८ व्या शतकात, पश्चिमेकडच्या देशात, ह्या कलेचा प्रसार झाला. मध्य आशियातील, समरकंद भागातील आक्रमक अरबांनी, कागद तयार करण्यात निपुण असलेल्या चिनी लोकांना पळवून नेले. त्यांच्यामुळे अरब देशात कागद तयार होऊ लागला. अरबांनी १२ व्या शतकात ही कला युरोपात नेली. एकदा युरोपमध्ये कागद तयार करण्याचा प्रसार झाल्यावर, हा उद्योग वाढीस लागला. १८ व्या व १९ व्या शतकात इतर उद्योग धंद्या-प्रमाणे, ह्या धंद्याचंही यांत्रिकीकरण झालं. औद्योगिक क्रांतीमुळे कागदाची मागणी सतत व भरमसाठ वाढू लागली.

भारतातील कागदाचा आधुनिक कारखाना.



डावीकडे : मोहोंजोदारो येथे सापडलेला एक शिक्का.
उजवीकडे : लाकडी ठोकळ्यावरील कोरीव काम व त्याचा शिक्का.

मुद्रण

ठसे व शिक्क्यांच्या साहाय्याने हाताने छापण्याची कला तशी प्राचीन आहे (जशी आजकाल, लाकडी कोरीव ठश्यांनी साडीवर छपाई होते तशी) साडीवरचं, दोन, तीन रंगातलं अवघड नक्षीकाम लाकडाच्या ठश्यांवर, कोरणारा कुशल कारागिर पानभर चित्र, नी लिहिण्याचा मजकूर नक्कीच तयार करू शकेल. पण हे ठसे रबराच्या ठश्यांप्रमाणे, किंवा आरश्यात दिसणाऱ्या उलट प्रतिमेप्रमाणे केले, तरच ते सुलट वाचणं शक्य होई. १८०० वर्षापूर्वी चिनी लोकांत, पुस्तक छापण्याची हीच पद्धत अवलंबिली जाई. त्यानंतर काही वर्षांनी सचित्र व छोट्या मजकुरासाठी ह्या पद्धतीचा इतर ठिकाणीही उपयोग केला जाऊ लागला.

पण अशा पद्धतीने फारच थोडी पुस्तकं छापून व्हायची, ह्यांत आश्चर्य वाटायला नको. शेकडो लाकडी शिक्के कोरण्यात वेळ, पैसा व श्रम घालवण्यापेक्षा, पुस्तकाची हाताने नक्कल करून दुसरी प्रत करणेच, लोकांना जास्त सोईचं होई ! शिवाय कमी मजकुरासाठी लाकूड कोरणे दगदगीचे वाटे. बरं, मोठ्या ठश्यांचा उपयोग केला, तर ठसेही खूप प्रमाणात लागत. कमी शब्द असलेल्या पानांची मोठी पुस्तकं वाचायला त्रासाची व कंटाळ-वाणी वाटायची !

पूर्ण पानेच्या पाने कोरण्याऐवजी, एक एक अक्षर स्वतंत्रपणे कोरून, ती अक्षरं योग्य प्रकारे जुळवून, ठराविक जागा सोडून व विराम चिन्हे घालून शब्द, ओळी लिहिलेली पानं तयार करण्याच्या कल्पनेने ह्यात आमूलाग्र बदल झाला. आजचा मुद्रक ज्याला जुळणी करणे म्हणतो, ती हीच पद्धत! मुद्रण झाल्यावर हा जुळवलेला सांचा सुटा करता येतो व दुसऱ्या पुस्तकाच्या मुद्रणासाठी कोरलेली अक्षरे पुसट होईपर्यंत पुन:पुन्हा वापरता येतात.

गटेनबर्गच्या बायबल प्रतीच्या छपाईची ५०० वी शताब्दी साजरी करण्यासाठी जर्मन देशाने १९५६ साली काढलेला पोस्टाचा शिक्का.

वर वर दिसायला ही कल्पना तशी साधी व सरळ वाटली, तरी ती प्रत्यक्षात साकार व्हायला बऱ्याच अडचणी आल्या. बरेच प्रश्न उद्भवले, पण ते सारे सोडवले गेले. ह्यापूर्वीच लाकडाच्या शिक्क्यांवर लहान अक्षरे कोरून ब्लॉक तयार करणे, किती जिकिरीचे व कष्टाचे होते; ह्याचा उल्लेख आलेला आहे. मग अशी अक्षरे छोट्या लाकडी काड्यांवर कोरणं किती कठीण होत असेल, ह्याची नुसती कल्पनाच केलेली बरी ! एक पानभर मजकुरासाठी एकाच अक्षराचे किती साचे करावे लागले असतील ? ह्याच पानावर असलेले 'स' व 'न' ही अक्षरे मोजा, म्हणजे तुम्हाला थोडी कल्पना येईल !

परंतु अशा अनेक अडचणींना तोंड देत, भाजलेल्या मातीचा, लाकडाचा, ब्रांझचा व पत्र्याचा उपयोग ठसा करण्यासाठी, हुषार चिनी लोक एक हजार वर्षापासूनच करीत होते. हे सर्व उपयोग अगदी मर्यादित स्वरूपाचे होते. कारण त्यांत काही अडचणी आल्या असाव्यात ! आणि म्हणून प्राचीन चीनमध्ये, मुद्रणासाठी प्रामुख्याने लाकडाच्या साच्याचाच उपयोग करण्याचा प्रघात पडला होता.



गटेनबर्गच्या बायबलमधील एक पान. प्राचीन लॅटिन भाषेत लिहिलेले.

धातुचा सरकता टाईप

शेवटी हा प्रश्न १४५० च्या सुमारास असामान्य कल्पक बुद्धिमत्तेच्या जोहान गटेनबर्ग ह्या जर्मन माणसाने शास्त्रीय प्रगतीच्या व धातूचा वापर केल्या जाणाऱ्या कलेच्या आधारे सोडवला. गटेनबर्गने, प्रत्येक अक्षराचे

आरश्यांतील प्रतिबिंब, धातूच्या काडीवर खोदून तयार केले. अशा काडीला पंच म्हणतात. असे पंच चपट्या तांब्याच्या किंवा पितळेच्या पट्ट्यांवर–मेट्रिक्सवर–जोराने ठोकून अक्षरांची प्रतिमा पट्ट्यांवर उमटवली जाई. ह्या पट्ट्या साच्यांवर ठेवून त्यात वितळवलेला शिश्याचा रस ओतून, हा रस थंड झाला की, धन स्वरूपाचा उलट्या प्रतिमेचा टाईप तयार होई.

आता, तुमच्या लक्षात आलेच असेल की, अशा साच्यांच्या सहाय्याने बऱ्याच मोठ्या प्रमाणावर टाईप बनविणे शक्य झाले आणि एकदा का मेट्रिक्स तयार झाले की, त्याचे अनेक साचे करून, पुष्कळांना त्याचा उपयोग करता येऊ लागला. अशा धातूंचे टाईप केल्यावर, शब्द, ओळी, व पाने भरून मुद्रण करून, पुन्हा तो सुटा करून, तोच टाईप पुसट होईपर्यंत वापरता येऊ लागला. शिवाय पुसट झालेला टाईप परत वितळवून त्याचे पुनः साचे तयार करता येऊ लागले ते निराळेच !



पुणे ४११०३०

मुद्रण यंत्रे


गटेनबर्गच्या काळातील एक प्रकारचा छापखाना.

जुळवलेल्या मजकुरांचे मुद्रण करण्यासाठी जुळवलेल्या टाईपचे खिळे, एका ट्रे वर असे घट्ट बसवले जातात, की हालून ते एकमेकात मिसळू शकत नाहीत. टाईपाच्या पृष्ठभागावर शाई पसरून, व्यवस्थित बसविलेल्या कागदांवरून तो टाईप हाताने फिरणाऱ्या यंत्राच्या सहाय्याने फिरवून मजकूर मुद्रित केला जातो. मुद्रित झालेला कागद, दाब कमी करून, शाई वाळण्यासाठी दूर केला जातो. ह्याच पद्धतीने मुद्रित मजकुराच्या हव्या तेवढ्या प्रती काढल्या जातात. दाबाचा वापर करून मुद्रण करण्याच्या, ह्या पद्धतीला 'प्रिंटिंग प्रेस' कां म्हणतात हे लक्षात आलं असेल. शाई लावलेला, जुळवलेला टाईप कागदावर घट्ट दाबून उमटविणे हे ह्या यांत्रिक प्रक्रियेचे प्रमुख कार्य आहे.

गटेनबर्गच्या काळापासून, मुद्रण कलेत फार झपाट्याने प्रगती झाली. एका मागून एक असे शोध लागल्याने, हातानी करायची कामें, यंत्राच्या सहाय्याने होऊ लागली. खिळे जुळवणी व मुद्रण देखील यंत्राच्या साह्याने होऊ लागले. जलदगती असलेल्या यंत्राच्या शोधाने मुद्रणकला अधिक प्रगत झाली व छपाईचा दर्जा उंचावला. यंत्रांची क्षमता वाढली, व प्रगत राष्ट्रात तर अनेक प्रक्रिया एकाचवेळी करणारी अवाढव्य यंत्रे वापरात येऊ लागली. उदा. यंत्राच्या एकाबाजूने कागदाची भेंडोळी असलेली रिळे लावून,

दुसऱ्या बाजूने वेष्टनासहित पुस्तक तयार होऊ शकते. जुळवलेल्या मजकुराच्या प्लेटस् यंत्रात योग्य रीतीने बसवल्या की मग कुठल्याही माणसाची मदत लागत नाही. एवढेच काय, गेल्या दहा पंधरा वर्षांत लागलेल्या नवीन शोधांमुळे, तर धातूच्या खिळयांनी जुळवलेल्या टाईपचीही गरज राहिली नाही ! असं असलं तरी मुद्रण करण्यासाठी धातूंच्या खिळयांचा म्हणजेच टाईपचा उपयोग अजूनही सर्वत्र व सर्रास होतो. आपल्या देशात तर सामान्यतः मुद्रणासाठी ह्याचाच उपयोग केला जातो.

आजकाल पुस्तकं कशी तयार होतात, ह्याची थोडक्यात माहिती करून घेण्यापूर्वी पुस्तकाच्या सुरवातीस ज्याचे नाव छापले जाते त्या लेखकाचा आधी परिचय करून घेऊ या.



छापण्याचे लहानसे मशीन. साधारणतः ६० वर्षांपूर्वीचे जुने. भारतात आज देखील अनेक छापखान्यातून वापरले जाते.

विद्यार्थी ग्रंथालय
न्यू इंग्लिश स्कूल, टिळक
पुणे ४११०३०.

लेखक, प्रकाशक आणि कॉपीराईट

हाताने लिहून जेवढ्या प्रती तयार होतील त्यापेक्षा किती तरी जास्त, कमी श्रमात व कमी वेळात छपाई व कागद ह्याच्या सहाय्याने तयार होऊ लागल्या. पण उच्चदर्जाची मुद्रण यंत्रे व अनेक छपाई कामगार आहेत अशाच छापखान्यांत हे शक्य होते. कारण कागद, इतर सामुग्री व बाइंडिंगचा खर्चही बराच असतो. जरी पुस्तक छापण्याइतका पैसा लेखकाजवळ असला तरी, पुस्तकाच्या काही प्रती सोडून बाकीच्या प्रती खपवणं त्याला जवळ जवळ दुरापास्तच असतं. मग इथेच प्रकाशकाची आवश्यकता जाणवते. काही विशिष्ट मोबदल्यात, लेखक आपलं लिखाण छापून पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याचा हक्क प्रकाशकाला विकतो आणि आपल्याला काही फायदा होईल ह्या विचाराने प्रकाशक लेखकाचं पुस्तक छापतो. शेवटी प्रकाशक हाही एक व्यावसायिकच असल्याने पुस्तक विक्रीच्या धंद्यात काही नफा होईल, अशी खात्री झाल्याशिवाय पुस्तक प्रकाशनात पैसा गुंतवत नाही. इतर वस्तूंच्या उत्पादकांप्रमाणे पुस्तक निर्मिती व विक्री वाटपाची सर्व व्यवस्था प्रकाशकालाच करावी लागते ह्या पूर्वीच लेखकाचा पुस्तक छपाईचा प्रकाशकाला हक्क विकण्याबद्दलचा निर्देश येऊन गेलेला आहे.

लेखकाचा हा हक्क म्हणजे आपल्या लिखाणाच्या प्रती काढून, पुस्तक वाचनासाठी इतरांना उपलब्ध करून देणं होय ! लेखकाच्या ह्या हक्काला, इतर देशांप्रमाणे आपल्या देशातही कायद्याचं संरक्षण आहे. ह्या हक्काला 'कॉपी राईट' म्हणतात. लेखकाला त्याच्या हयातभर व त्याच्या नंतर त्याच्या वारसदारांना ५० वर्षापर्यंत हा हक्क बजावता येतो आणि त्यानंतर मात्र पुस्तकाच्या प्रती काढण्यासाठी, कोणाच्याही परवानगीची गरज नसते. उदा. १९४१ साली मृत्यू पावलेल्या रविंद्रनाथ टागोरांच्या





ऑफसेट छपाईचे यंत्र. एकानंतर एक चार रंगांची छपाई होऊ शकते. काही मशीनवर कागदाच्या दोन्ही बाजूंनी एकाच वेळी छपाई होऊ शकते. कागदाच्या भेंडोळ्या लावल्या की, हे यंत्र सतत छपाई करीत असते.

न्यू इंग्लिश स्कूल, टि.व.
पुणे ४११०३०.



कॉपीराईटचे आंतरराष्ट्रीय चिन्ह. कॉपीराईट ज्याच्या नावावर असतो, त्याचे नाव. लेखनाचे, प्रकाशनाचे वर्ष छापलेले असते.

लिखाणाचे कॉपीराईट अजून संरक्षित आहेत, तर १९२० साली वारलेल्या टिळकांच्या लिखाणाबद्दल मात्र नाहीत!

बऱ्याच वेळा लेखकाला कॉपीराईट हक्काचं संरक्षण मिळत नाही. खरं म्हणजे मुद्रण व प्रकाशन ह्या व्यवसायाची वाढ होण्यापूर्वी अशा हक्काची जरूरीसुद्धा वाटत नव्हती. कमी वेळात, पुस्तकांच्या जास्त प्रती निघून, त्यांच्या विक्रीने नफा मिळू लागल्यावरच कॉपी राईट हक्काच्या संरक्षणाची लेखकाला गरज वाटू लागली. कॉपी राईट ह्या हक्काने लेखकच काय पण प्रकाशकालाही संरक्षण मिळू लागलं. कारण एकदा प्रकाशित करायला घेतलेले पुस्तक दुसरा प्रकाशक छापू शकत नाही.

बऱ्याचशा देशांनी लेखकांच्या कॉपी राईट हक्काबद्दल एकमेकांना मान्यता दिली असली तरी अजून असेही काही देश आहेत, की ते हा हक्क मान्य करीत नाहीत. असं असलं तरी बहुतेक सर्व देशामध्ये लेखकाच्या ह्या हक्काला कायद्याचं संरक्षण आहे.

पुस्तक विक्रेत्यांची सूट

प्रकाशित केलेल्या पुस्तकांच्या प्रती, पुस्तक विक्रेत्यांनी खपवाव्या म्हणून त्यांना, मूळ किंमतीच्या विशिष्ट टक्के जी सूट दिली जाते, त्याला व्यापारी सूट म्हणतात. उदा. ज्या पुस्तकाची किंमत ग्राहकाला १० रु. पडते, ते पुस्तक प्रकाशक विक्रेत्याला २५ टक्के सुटीने म्हणजे ७ रु. ५० पै. ला विकतो. १० रु. चं पुस्तक खपवल्यानंतर विक्रेत्याला त्यातून, त्याच्या खर्चासाठी व नफ्यापोटी २ रु. ५० पै. मिळतात.

लेखकाचे मानधन

आणि लेखकाचं काय? त्याला मानधन कसं मिळतं?

लेखकानं प्रकाशकाला आपलं पुस्तक छापण्याची व विकण्याची जी परवानगी दिली आहे, त्या बदल्यात, प्रकाशक त्याला जो पैसा देतो, त्याला मानधन म्हणतात. एखाद्याच्या, कल्पक, नवनिर्मितीची ही परतफेडच असते असं म्हणाना! पुस्तक विक्रीवर काही टक्के मानधन ठरवलं जातं. म्हणजेच एका लेखकाच्या पुस्तकाच्या जास्त प्रती खपल्या तर त्याला जास्त मानधन मिळते. समजा १० रु. किंमत असलेल्या पुस्तकावर, जर १० टक्के मानधन असलं तर प्रकाशकाला प्रत्येक प्रतीबरोबर एक रु. लेखकाला द्यावा लागतो. छपाई व प्रकाशन ह्यांची वाढ झाल्यामुळे लेखकाला पुस्तकांवर पैसा मिळवणं शक्य झालं आणि कधी कधी तर त्या लिखाणावरच तो गुजराणही करू शकतो.

प्रकाशक व लेखकात जसा करार असेल, त्याप्रमाणे, लेखकाला इतरही प्रकारे मानधन मिळू शकतं. प्रती किती का खपेना, पण काही ठराविक रक्कमच प्रकाशकाने लेखकाला द्यायची किंवा ठराविक रक्कम प्रती छापल्या की किंवा क्वचित् असंही घडतं की पुस्तक छापाईसाठी केलेला खर्च पूर्णपणे वसूल होईपर्यंत, प्रकाशक लेखकाला काहीही पैसा देत नाही व त्यानंतर मात्र विक्रीत लेखकाची भागीदारी असते.

प्रकाशकाला पुस्तक प्रकाशित करताना व पुस्तकाची किंमत ठरवताना, पुस्तक विक्रेत्याला द्यावी लागणारी सूट, लेखकाचं मानधन, छपाई व प्रकाशनाचा खर्च, विक्रीवाटप व त्याचे इतर खर्च ह्या गोष्टी लक्षात घेऊनच पुस्तकाची किंमत ठरवावी लागते.

नॅशनल बुक ट्रस्ट, पुस्तकाचे दुकान—दिल्ली

संपादक

कोणती पुस्तके प्रकाशित करायची, व कुठल्या लेखकाचे कोणते पुस्तक प्रकाशित करायचे, ह्याबद्दलचा सल्ला मसलत करण्यासाठी प्रकाशक संपादकांची नेमणूक करतात. पुस्तक उत्तम आहे का व त्याच्या जास्तीत जास्त प्रती खपून दुसरी आवृत्ती लवकर निघेल, ह्या दोन कसोट्या प्रकाशक पुस्तक प्रकाशित करताना लावतो. संपादकाचे पुढचे काम म्हणजे, लेखकाच्या हस्तलिखिताची प्रत मुद्रणाला देण्यासाठी तयार करणे. त्यासाठी हस्तलिखित काळजीपूर्वक वाचावं लागतं. ह्या पुस्तकाचे वाचक कोणते आहेत हे लक्षात घेऊन, त्यात काय बदल केला तर ते अधिक वाचनीय होईल, ह्या बद्दलच्या सूचना तो लेखकाला करतो. जरूर वाटल्यास काही भाग गाळावा लागतो, काही भागात काटछाट करावी लागते तर काही मजकूर वाढवावा लागतो. हे सर्व चालू असतानाच, हस्तलिखितातलं व्याकरण, शब्दरचना वाक्यरचना वगैरे चपखल आहेत ना ह्याचीही छाननी चालू असते. मुद्रकाने कुठला टाईप घ्यायचा हेही सुचवलं जातं. मुद्रणप्रत तयार करणे, ही ह्या प्रक्रियेतील दुसरी पायरी होय. अशा सूचनांसह असलेल्या हस्तलिखिताच्या प्रतीला मुद्रकांच्या भाषेत ' मुद्रणप्रत ' म्हणतात.

जुळवणी व प्रुफे

सर्वप्रथम मुद्रकाला, पुस्तकाच्या टाईपाबद्दल निर्णय घ्यावा लागतो. आपल्या देशात व विशेषत: भारतीय भाषांमध्ये, गटेनबर्ग पद्धतीप्रमाणे, म्हणजेच हाताने जुळवणी करण्याची पद्धत आहे. ह्या पुस्तकाच्या हिंदी, उर्दू व इंग्लिश ह्या भाषेतील आवृत्त्या सोडल्यास, इतर भाषेतल्या

मोनोटाईप जुळवणी यंत्राचा की-बोर्ड





A Monotype caster. Following the code punched on the paper roll, this machine casts type , letter by letter, and arranges it in llnes on the tray seen at the upper right of the picture.





मोनोटाईप फोटोसेटिंग की–बोर्ड.

आवृत्यांची जुळवणी हातानेच केली जाई. परंतु हल्ली प्रमुख भारतीय भाषेतल्या मजकुराची जुळवणी करताना, सर्रास यंत्रांचा उपयोग केला जातो. वितळवून तयार केलेल्या धातूच्या सेटवर, टाईप–राईटरसारख्या की-बोर्ड असलेल्या यंत्रानं अक्षरं, शब्द व ओळी एकामागून एक उमटवून, टंकलिखित मजकुराचा टाईप तयार होऊन पाहिजे तसा वापरण्यासाठी उपलब्ध होतो. पण पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे ह्यातही आता बरीच सुधारणा झाली आहे. धातूंचा टाईप मुद्रणासाठी वापरण्याची आवश्यकता आता उरली नाही. अत्यंत आधुनिक की–बोर्ड यंत्रांनी, ओळीमागून ओळींच्या मजकुराची फोटो फिल्म आपोआप घेतली जाते. ह्या पुस्तकाच्या

लिनोटाईप यंत्र.



जुळवणीसाठी वापरावयाची छोटी पट्टी.

हिंदी व इंग्रजी भाषेतील आवृत्त्या अशाच फोटो किंवा फिल्म सेटिंग पद्धतीने केल्या आहेत. गटेनबर्गच्या पद्धतीने केलेल्या मुद्रणापेक्षा ही मुद्रण पद्धत अगदी वेगळी आहे–त्याबद्दलचे थोडक्यात वर्णन नंतर येईलच !

धातूंवर टाईप केलेला मजकूर साठवण्यासाठी लांब ट्रे वापरतात, त्यांना गॅलीज् म्हणतात. फोटो सेटिंग पद्धतीत, हाच टाईपसेट निगेटिव्ह फिल्मच्या स्वरूपात साठवला जातो. कच्ची मुद्रण प्रत, अशा मजकुरावरून, हस्तचलित यंत्राने शाई पसरवून फिरत्या रुळाच्या सहाय्याने तयार केली जाते. फोटोसेटिंग पद्धतीत, कच्ची मुद्रणप्रत तयार करण्यासाठी प्रकाश–संवेदनाक्षम असणाऱ्या स्वस्त कागदाचा वापर केला जातो. अशा कच्च्या मुद्रित प्रतींना गॅली प्रुफे म्हणतात. मुद्रकाच्या परिभाषेत, मजकूर तपासण्यासाठी व त्यांतील चुका दुरुस्त करण्यासाठी ज्या थोड्या प्रती काढल्या जातात, त्यांना प्रुफे म्हणतात. नंतर, अशी कच्ची गॅली प्रुफे प्रकाशक व लेखक तपासून पाहातात. त्यांतल्या चुका मुद्रकाच्या निर्देशनास आणून, ती प्रुफे परत पाठवली जातात. शिवाय, चित्रे, आकृत्या, मथळ्यांच्या जागा, पानांचा आकार

पुणे ४११०३०

व पानांप्रमाणे मजकुराची विभागणी ह्या सारख्या सर्व आवश्यक बाबींबद्दल तपशिलवार सूचनाही मुद्रकाला दिल्या जातात.

याप्रमाणे पाने तयार झाल्यावर, त्यांची प्रुफे पुन्हा एकदा तपासली जाऊन सर्व चुकांची दुरुस्ती झाल्यावरही आणखी एकदा त्याची तपासणी होते. सर्व मजकूर बरोबर छापून येईल व त्यांत आता कसल्याही दुरुस्तीची आवश्यकता नाही, अशी प्रकाशकाची व लेखकाची पूर्ण खात्री झाली की मगच प्रकाशक मुद्रकाला छापण्याची परवानगी देतो.



गॅली ट्रे,

गॅलीची दोन पाने.

इम्पोझिशन

गटेनबर्गच्या वेळेपेक्षा, छपाईच्या कामात आता खूपच प्रगती झालेली आहे. आता एका वेळेला ६५×८६ सेंटिमिटरचा एक कागद– म्हणजेच पुस्तकाची सोळा पानं, एका बाजूने एका वेळेला छापली जातात. ह्या पुस्तकांतील मजकूर अशा मशिनवर मुद्रित व्हायला फक्त ४ रन्स पुरे होतात. काही छपाईयंत्रावर एकाच वेळेला दोन्ही बाजूला, एका मागोमाग एक असे वेगाने छापले जाते. पुस्तकातल्या काळ्या, पांढऱ्या रंगाच्या आकृत्या, चित्र छपाईच्याच वेळेला तयार होतात पण पुस्तकातल्या रंगीत चित्रांसाठी वेगळ्या प्रक्रियेची गरज असते. आता हे सर्व आपल्याला समजावून घेणं सोपं पडावं म्हणून आपल्या छपाईयंत्रावर एकावेळी, चारच पानं छापली जातात, असे आपण समजू या !





ऑफसेट मशिन.

the wood. A key fits into the eyes in the circular parts. This is turned to tighten or loosen the metal furniture.



पानांचा अनुक्रम लावला जात आहे. (पुस्तकामध्ये जी माहिती दिलेली आहे, ती वाचा.) काळ्या अक्षरात जे आकडे दिसतात, ते कागदाच्या वरच्या पानावरील आकडे आहेत. पिवळ्या रंगातील आकडे मागील पानावरील आहेत.



आयताच्या आकाराचा एक कागद घ्या. लांबीच्या बाजूने, ह्या कागदाची घडी करून नंतर रुंदीच्या बाजूने, उजवीकडून डावीकडे, अशी मधोमध घडी पाडा. पान न कापता त्याच्यावर १ ते ८ असे क्रमांक द्या. तुम्हाला असं दिसून येईल की, कागदाच्या एका बाजूला १, ४, ५, ८ असे क्रमांक येऊन, कागदाच्या दुसऱ्या बाजूला २, ३, ६, ७ असे क्रमांक येतात

व अशा पद्धतीने मुद्रित झालेल्या कागदाची घडी घातल्यावर, पुस्तकाची पानं क्रमवार व एकापाठोपाठ बरोबर नंबराप्रमाणे जुळून येतात. छपाईच्या मजकुराचे फॉर्म्स पोलादी चौकटीत बसवून मुद्रक ते घट्ट बंद करतो. प्रत्येक पानाला योग्य तेवढा व सारखा समास सोडला गेलाय की नाही, हेही मुद्रकाला पहावं लागतं. त्याचप्रमाणे पानाच्या दोन्ही बाजूला योग्य त्या मजकुराची छपाई होतेय की नाही व दोन्ही पानं छापली जातात की नाही, ह्यावरही लक्ष ठेवावं लागतं. सुबक छपाई झालेल्या पुस्तकाचं एक पान प्रकाशाजवळ धरल्यावर, आतापर्यंत केलेल्या कष्टाचं फळ मिळतं. परंतु तुम्ही अशीही काही पुस्तकं पाहिली असतील की त्यांची छपाई निष्काळजीपणाने झालेली आहे.



अनुक्रमाप्रमाणे सर्व विभागांचे गट गोळा करण्यात येत आहेत.

पुणे ४११०३०

बांधणी

अशा रीतीने सर्व फॉर्म्स मुद्रित झाल्यानंतर मुद्रण झालेले कागद बांधणीसाठी पाठवले जातात. कागदाची संख्या अर्थातच पुस्तकाच्या मजकुरावर अवलंबून असते. बांधणी विभागात ह्या कागदांच्या घड्या घालून, क्रमवार एकत्र ठेवून ती शिवली जातात. शिवलेल्या पुस्तकांची पानं, वरच्या, खालच्या व उजव्या बाजूने (उर्दूसाठी डाव्या बाजूने) कापून मोकळी केली जातात. पानांचे कोपरे कापल्याने पुस्तकं सुबक दिसतात. कागद किंवा पुठ्ठ्याचे मुखपृष्ठ घातल्यावर पुन्हा. कागदाचे किंवा कापडाचे आवरण घातले जाते. ह्या पुस्तकासारख्या छोट्या ३२ पानांचे दोन भाग

एकत्र जमा केलेले सर्व विभाग शिवून एकत्र चिकटवले. अधिक बळकटी यावी म्हणून पट्ट्या लावलेल्या दिसतात.



पुस्तकाचे कव्हर तयार होत आहे. जाड पुठ्ठ्यांमध्ये ते बांधले जाते.





पुस्तक बांधणीची प्रक्रिया

असलेल्या पुस्तकांमध्ये, एका भागावर दुसरा भाग ठेवून त्याच्यावर मुखपृष्ठ चढवून, पुस्तकं तारेने बांधली जाऊन पुस्तकाला योग्य आकार दिला जातो. १६ पानं असलेली, ४ भाग किंवा ८ पानांचा भाग असलेली पुस्तकं देखील अशीच बांधली जातात.

यू इंग्लिश स्कूल, टि
पुणे ४११०३०

ऑफसेट छपाई

ह्या पुस्तकाच्या हिंदी व इंग्रजी आवृत्या ह्या फोटोसेट पद्धतीने मुद्रित झाल्या आहेत हे विसरून चालणार नाही. फोटोसेट निगेटिव्ह फिल्मपासून मुद्रण कसे करतात ? तर हे सर्व फोटोऑफसेट पद्धतीनं होतं. (गटेनबर्गच्या पद्धतीला लेटरप्रेस म्हणतात) ऑफसेट पद्धतीचे मुद्रण एका सपाट पृष्ठभाग असलेल्या प्लेटच्या सहाय्याने होतं. ह्या उलट लेटरप्रेस पद्धतीमध्ये, सपाट पृष्ठभाग असलेली प्लेट मुद्रणात वापरत नाहीत. पाणी व तेल हे एकमेकांत मिसळत नाहीत तर एकमेकांना दूरच सारतात, ह्या त्यांच्या गुणधर्माचा

ऑफसेट मुद्रण यंत्राची तत्त्वे



ह्या ऑफसेट पद्धतीमध्ये उपयोग करून घेतला आहे. मुद्रण करायच्या, मजकुराच्या किंवा आकृतीच्या प्रतिमा (फोटो), जस्ताच्या एका प्लेटीवर घेतल्या जातात. ह्या प्रतिमेतील तेलयुक्त भाग पाणी दूर सारतो पण शाईतील तेलाचे शोषण करतो. अशा प्रक्रिया झालेल्या जस्ताच्या प्लेटीवरून

प्रथम ओले रूळ व नंतर शाई लावलेले रूळ फिरवून मुद्रण केले जाते. पहिल्या वेळेला प्रतिमा सोडून इतर सर्व जागा ओलसर होतात. ओलसर जागा शाईत तेल असल्यामुळे शाईला दूर सारते व प्रतिमेच्या कोरड्या भागावरच शाई पसरली जाते. त्यानंतर एक रबरी रूळ अशा जस्ती प्लेटीवर फिरवून त्यावर ती प्रतिमा उमटवली जाते. नंतर हाच रबरी रूळ कागदावर फिरवला जातो व त्या रूळावरची प्रतिमा कागदावर छापली जाते.

ऑफसेट कॅमेरा,



चित्रे व रंग

जस्ताच्या किंवा तांब्याच्या प्लेटी, लाकडावर लावलेल्या ब्लॉकच्या सहाय्याने, जुळवणी झालेल्या मजकुराच्या पातळीवर चित्र लावून, गटेनबर्ग किंवा लेटरप्रेस पद्धतीत छापली जायची. ज्या लाकडांवर अशा चित्रांच्या प्लेटी असतात, त्यांना 'ब्लॉक्स' म्हणतात. आकृत्या अशाच फोटो किंवा रासायनिक क्रियेने प्रथम धातूच्या प्लेटवर घेतात. मुद्रण व्हायचा पृष्ठभाग सोडून बाकीचा भाग मुद्रित टाईपाच्या पृष्ठभागापेक्षा खोल असल्याने, आपोआपच आकृत्या तेवढ्या कागदावर उमटतात.

ऑफसेट मुद्रण पद्धतीत चित्रे अशाच रीतीने मुद्रित करतात. फरक एवढाच, की मुद्रित करायचा भाग सपाट पृष्ठभागावरच असतो. मजकुराप्रमाणे त्याचीही प्रतिमा सपाट पृष्ठभागावर घेतली जाते. समजा, जेव्हा आपल्याला काळ्या रंगांत मुद्रण करायचे असते, तेव्हा एकाच प्लेटवर आकृत्या व मजकूर घेतला जातो.

जेव्हा बऱ्याच रंगांत छपाई करायची असते तेव्हा, एकावेळी एकाच रंगाचा वापर करून छपाई पूर्ण करतात. ह्या पुस्तकाचं मुखपृष्ठ सोडून, इतर चित्रे छापताना, एकाच रंगाचा वापर केल्याने हे सरळ व सोपं झालं.

परंतु अनेक रंगातील व कमी जास्त गडद चित्रे दाखवायची असल्यास, प्रतिमेचे ठिपक्यात रूपांतर करावे लागते. चित्राचा ब्लॉक किंवा ऑफसेट करताना, एका भिंगासमोर आडव्या रेघा असलेली, एक काचेची प्लेट, चित्रासमोर धरून प्रतिमा घेतली जाते. ब्लॉक किंवा प्लेटवर अनेक टिंबे जवळजवळ उमटली की गडद प्रतिमा तयार होते. ह्या उलट टिंबं कमी व दूर अंतरावर असल्यास प्रतिमा फिकट उमटते व मधली जागा कोरी राहाते. फिकट असलेली प्रतिमा लवकर किंवा हळू गड़द बनू शकते व ह्या छायाप्रकाशाच्या सहाय्याने फोटोतील गडद किंवा पुसट भाग प्रतिमेवर प्रतिबिंबित होतो.

वर्तमानपत्रात येणाऱ्या फोटोचं जर तुम्ही बारकाईने निरीक्षण केलं तर तुम्हाला टिंबमय चित्रे स्पष्टपणे दिसतील. सूक्ष्मदर्शक भिंगाने जर हा फोटो पाहिला तर टिंबाच्या कमी जास्त अंतराने रंगांतील छटा लक्षात येतात.

काळ्या व पांढऱ्या रंगातील चित्र तयार करताना गडद किंवा फिकट छटांनी काम भागतं. पण रंगीत फोटोग्राफ किंवा चित्र मुद्रण करताना विविध रंगांच्या छटा हुबेहूब येणे आवश्यक असतं.

सुदैवाने ह्या छटा मुख्यत: पिवळा, जास्वंदी, निळा व काळा ह्या चार रंगांच्या मिश्रणाने दाखवता येतात. ह्या चार रंगाच्या कमी जास्त मिश्रणाने हवा तसा परिणाम साधता येतो. ह्या रंगाच्या ब्लॉक्स किंवा प्लेटस् तयार झाल्यावर त्या एका पाठोपाठ एक छापून, मुद्रित चित्रात मूळ चित्रातील रंग, प्रतिबिंबित होऊ शकतात. फोटोग्रॅफिक फिल्टर्स वापरून विशिष्ट रंगांचे भाग वेगळे केले जातात व मुद्रित होत असताना, नको असलेल्या रंगाचा भाग फिल्टरने शोषला जातो व आवश्यक असलेल्या रंगाचा भाग तेवढाच मुद्रित होतो. हीच पद्धत इतर रंगाच्या वेळेला वापरून चित्र पुरे केले जाते. चार रंगाच्या चित्राच्या वेळी चार निगेटिव्हस् तयार केल्या जातात व मग त्यांचे ब्लॉक्स व प्लेटस् तयार होतात. मुद्रण करताना हे ब्लॉक्स वापरले गेले की, मूळ चित्रांतील रंग व छटा अतिशय परिणामकारक रीतीने व हुबेहूब चित्रात उमटतात.



हाफटोन ब्लॉक.



मोठा बनवलेला पडदा.





हाफटोन चित्र व मोठे बनवलेले चित्र. छिद्रे दिसत आहेत.



हाफटोन ब्लॉक कसा दिसतो.

एखादं मौल्यवान् चित्र अधिक उठावदार व अत्यंत परिणामकारक करण्यासाठी सात आठ किंवा त्यापेक्षा जास्त रंगाचा वापर करून मग त्याचं मुद्रण केलं जातं. उदा. भारतीय प्राचीन चित्रांमधला (मॅनिएचर पेंटिंग) सोनेरी रंग दाखवण्यासाठी, मंद पिवळ्या रंगाच्या चार वेळा



दोन रंगांच्या लाइन ब्लॉकचा एक सट

प्रक्रिया केल्या जातात. सोनेरी रंग खरा दिसण्यासाठी खोट्या किंवा खऱ्या सोन्याचा वर्खही शाईत टाकण्याची पद्धत आहे आणि जर अगदी हुबेहूब चित्र नको असेल तर मात्र काळा रंग न वापरता बाकीच्या तीन रंगात मुद्रण केलं तरी चालतं. बाकीच्या तीन रंगाच्या मिश्रणाने करड्या व काळ्या रंगाच्या इतर छटा मिळू शकतात. पण येवढं मात्र खरं की काळा रंग वापरल्याशिवाय मूळ चित्रांतील छटा कधीच हुबेहूब व ठळक येऊ शकत नाहीत.

ह्या पुस्तकाच्या मलपृष्ठावर चार रंगांतील मुद्रणाची प्रक्रिया सचित्र दिलेली आहे.

ह्या पुस्तकाच्या सगळ्या भाषेतील आवृत्यांमध्ये चित्र व मजकुराची पाने एक किंवा दोन रंगात मुद्रित झालेली आहेत. पण मुखपृष्ठ मात्र ऑफसेट पद्धतीने चार रंगात छापले आहे. हिंदी व इंग्रजी आवृत्या फोटोसेटिंग करून, ऑफसेट पद्धतीने केलेल्या आहेत. उर्दू आवृत्तीसाठीही, मुद्रण ऑफसेट पद्धतीने झालेले आहे. पण मूळ मजकूर मात्र सुंदर हस्ताक्षर असणाऱ्याकडून लिहून घेतला आहे. व मग फोटोग्रॅफिक पद्धतीने ऑफसेट प्रिंटिंग झालेलं आहे. म्हणजे ह्या उर्दू आवृत्तीत आपण आपल्या पूर्वजांचा आदर्श गिरवला आहे. लेखकाची प्रतिभा व सुरेख वळणदार अक्षर असणाऱ्यांकडून लिहून घेतलेल्या, सुंदर पुस्तकांची प्राचीन परंपरा इथं आपण पाळली आहे. पण त्यांतही एक फरक आहेच ! आज आपण सुंदर हस्ताक्षरांतल्या अगणित प्रती काढू शकतो. पूर्वी अशी पुस्तकं फार थोड्यांना उपलब्ध होत तर आज हव्या तेवढ्या प्रती काढून जास्त प्रमाणांत उपलब्ध करून देता येतात !

पुणे ४११०३०

सर्वांसाठी पुस्तकं

युनेस्कोच्या स्टॅटिस्टीकल इयर बुक १९७६ प्रमाणे भारतात १९७५ साली विविध विषयांवरची एकूण १२७०८ नवी पुस्तकं प्रकाशित झाली. लोकसंख्येच्या प्रत्येक दशलक्षाला, सुमारे वीस नवी पुस्तके, असे हे प्रमाण पडते. त्याच आधारे सर्व जगांत प्रकाशित झालेल्या पुस्तकांचे आकडे असे– दर दशलक्ष लोकसंख्येमागे १८२, सुधारलेल्या किंवा अतिप्रगत देश ३४६, विकसनशील देश ९०, अरब राज्ये सोडून इतर आशिया खंड ६२ ! यावरून ह्या बाबतीत आपण किती मागे आहोत ह्याची कल्पना यावी. खरं

तिसरे जागतिक पुस्तक प्रदर्शन, दिल्ली– 1978 एक देखावा.

तर १९६३ साली, भारतात अधिक पुस्तके म्हणजे, दर दशलक्षामागे २७ नवी पुस्तकं प्रकाशित झाली होती. कागदाच्या वाढत्या किंमती व अपुरा पुरवठा, ह्यामुळे प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची संख्या बरीच घटली ह्या अडचणीवर नंतर मात करण्यात आली असली तरी, दर दशलक्ष लोक-संख्येमागे प्रकाशित झालेल्या नव्या पुस्तकांची संख्या ३० च्या आसपासच रेंगाळत आहे.

1978 मधील जागतिक पुस्तक प्रदर्शनात

ह्या नैराश्यजनक परिस्थितीचे मूळ कारण आपले दारिद्र्य हेच होय ! शिवाय आपल्या देशात शेकडा ७० टक्के लोक अजून साक्षर नाहीत दारिद्र्य व निरक्षरता तशी जोडीनेच आढळते. त्यांतल्या एकाचा निःपात करायचा तर दुसऱ्याचाही करायला हवा. ह्या दोघांचा नायनाट करायचा असेल, तर पुस्तकं अगदी आवश्यक आहेत.

विविध आवडीच्या लोकांसाठी, वेगवेगळ्या प्रसंगावरची सर्व प्रकारची पुस्तकं, आपल्याला हवी आहेत. आपल्याला पांडित्यपूर्ण पुस्तकं हवी आहेत, तशीच विज्ञान व तंत्रज्ञानावरचीही पाठ्यपुस्तकं हवी आहेत ! तसेच आपल्या निरनिराळ्या तत्कालीन समस्यांवरची पुस्तकं हवी आहेत. त्याच प्रमाणे विनोदी पुस्तकं हवी आहेत. विचार प्रवृत्त करणारी पुस्तकं हवी आहेत. तसंच गोष्टींचीही पुस्तकं हवी आहेत. वेगवेगळे छंद जोपसण्या-साठी, त्याच्या माहितीची पुस्तकं हवी आहेत. पिके व जमिनीबद्दलची माहिती देणारी पुस्तकं आपल्या शेतकऱ्यांना हवी आहेत. उड्डाण विषयाची पुस्तकं वैमानिकाला हवी आहेत. अशा किती तरी विषयांची पुस्तकं हवी आहेत ह्याची गणतीच करता येणार नाही.

पुस्तकांमुळे आपण एकमेकांना, व ह्या जगात रहाणाऱ्या इतर लोकांना समजू शकतो, ओळखू शकतो. आपल्याला काय करायचे आहे, ह्याची जाण पुस्तकांमुळे येते. पुस्तकं एकदा आपल्या हाती आली, की त्यावर आपली सत्ता असते. मनात येईल तेव्हा वाचावी, पुनःपुन्हा वाचावी आणि वाटलं तर दूर सारावी !

गाणी, सिनेमा आणि नाटकं ह्या प्रमाणेच काही पुस्तकं चांगली, तर काही वाईटही असू शकतात. वाचायला गंमतशीर किंवा रुक्ष वाटणारी, तशीच सोपी व समजायला कठीण वाटणारी पण पुस्तकं असतात. अशी एक म्हण आहे नां की जे एकाचे अन्न ते दुसऱ्याचे विष, ती पुस्तकाला पण लागू आहे. जे पुस्तक मला खूप चांगलं वाटेल, ते तुम्हांला कदाचित अगदी सामान्य वाटण्याची शक्यता आहे. अन् तुम्हांला आवडलेलं पुस्तक, मला कदाचित रुक्षही वाटेल.

पण मग कोणत्या पुस्तकांना वाईट ठरवायचं? लेखकाचं मनोगत किती का चांगलं असेना, जर ते पुस्तक आपला हेतू साध्य करू शकलं नाही, तर त्याला वाईटच मानावं लागेल. किंवा सुसंस्कृत समाज ज्या विचारांना अथवा कृत्यांना हानिकारक समजतो, अशा विचारांचा प्रसार करणाऱ्या किंवा कृत्यांना उत्तेजन देणाऱ्या पुस्तकांना वाईटच समजावं लागेल.

कलकत्ता येथील कॉलेज मार्गावरील पुस्तकाचे दुकान

इंग्लिश स्कूल, टिळक रोड, पुणे ४११०३०

पुस्तकांची उपलब्धता

पण, आपल्या देशी भाषेतील फारच थोडी, चांगली किंवा वाईट पुस्तकं आपल्याला मिळू शकतात. पुस्तकांचा योग्य उपयोग करून घेणाऱ्यांनाही, पुस्तकं मिळू शकत नाहीत. कारण त्यांना पुस्तकांपर्यंत पोहचताच येत नाही.

चोरी, भीक वा बक्षिस मिळवणं, हे प्रकार वगळल्यास, पुस्तक वाचायला मिळण्याचे दोनच मार्ग आहेत व ते म्हणजे एक तर पुस्तक विकत घेणे किंवा दुसरा मार्ग म्हणजे उसनवारीने आणणे!

आपण आवश्यक असलेली काही पुस्तकं तर विकत घेतोच! अगदीच एखाद्याजवळ पैसे नसले तर सोडून द्या! पण काही असलं तरी प्रत्येक विद्यार्थी क्रमिक पुस्तकं तरी नक्कीच विकत आणतो. त्याचप्रमाणे एखादा शब्दकोष, ॲटलास् तरी आपल्या हाताशी असावा, असे त्याला वाटते. ह्याशिवाय, आपल्यातील बहुतेकांना, स्वतःला आवडणारी, मनाला वाटलं तेव्हा वाचता येतील किंवा मधुनमधून त्यांत डोकवता येईल, अशी पुस्तकं संग्रही असावी असं वाटत असतं.

पण, आपल्याला हवीशी व आवश्यक असणारी सारी पुस्तकं, खरेदी करण्याची कुवत असणाऱ्यांची संख्या मात्र बोटावर मोजण्याइतकी किंवा जवळजवळ नगण्यच आहे. शिवाय एखादं पुस्तक, एका विशिष्ट कामासाठी तेवढ्या वेळेपुरतंच हवं असतं. उदा. शाळेतल्या एखाद्या गृहपाठाचा संदर्भ बघण्यासाठी! किंवा एखाद्या पुस्तकातील काही भागच, तेवढा आपल्याला वाचायचा असतो. अशा प्रासंगिक कामासाठी, मित्रांकडून किंवा वाचनालयातून ते पुस्तक आणणं हाच ह्यावरचा तोडगा होय! आपण विकत घेतलेले पुस्तक, आपल्या मित्रमंडळीत दुसऱ्यांजवळ नाही ना, ह्याची खात्री करून घेऊन मग पुस्तकं खरेदी केली तर स्वतः जवळच्या संग्रहात कितीतरी जास्त पुस्तकं आपल्याला ठेवता येतील.

६६६६

पुस्तकांची भागीदारी

पुस्तक दुसऱ्यांकडून उसनी आणणार असाल तर देण्याचीही तयारी ठेवली पाहिजे. पण आपल्यातील काही लोक असे वागत नाहीत. ह्यात केवळ त्यांचा अप्पलपोट्टेपणा नसतो, तर आपली पुस्तकं खराब होतील वा हरवतील, अशी भीती त्यांना वाटत असते आणि पुष्कळ वेळा असं घडतंही ! पण आपण सर्वांनीच – कुठलंही पुस्तक, मग ते आपलं असो वा दुसऱ्याचं असो, काळजीपूर्वक वाचायची सवय लावली, तर ही धास्तीच रहाणार नाही. आपल्या खास व विश्वासू मित्रांना, पुस्तकं उसनी देण्यात तुम्ही फार मोठा धोका पतकरताय असं मुळीच नाही. तुमचं माझ्याशी ह्या बाबतीत निश्चित एकमत होईल, की जेव्हा एखादं पुस्तक – मग ते साधं गोष्टीचं का असेना – तुम्ही नुसतं वाचत नसता तर, लेखकाबरोबर तुमचा संवाद साधला जातो आणि कित्येकदा पुस्तक संपल्यावरही, आपण त्यांत येवढे एकरूप झालेले असतो, की पुढे बऱ्याच दिवसांनीही हा पुन:प्रत्ययाचा आनंद घेता येतो. लेखकाने निर्माण केलेल्या समस्या, त्यावरचे तोडगे व टीपा हे सर्व पुस्तकात असतंच ! आणि चांगल्या पुस्तकाची जादू हीच म्हणावी लागेल की, आपण त्या पुस्तकात काय काय वाचलं ह्याबद्दलचे आपल्या मनात जेव्हा विचार येतात, त्या प्रत्येक वेळी वेगवेगळी उत्तरं व स्पष्टीकरणं लेखक आपल्याला देतोय असा भास होतो आणि मग त्या पुस्तकाची लज्जत वेगळीच वाटते. आपल्या मित्रांनीही तेच पुस्तक वाचलं असल्यास, त्यावरील चर्चेत तेही सामील होऊ शकतात आणि मग त्या पुस्तकाची गोडी जास्तच वाटू लागते.

वाचनालये

ज्या देशातील लोक वाचनासाठी बऱ्याच मोठ्या प्रमाणात पुस्तकं विकत घेऊ शकतात, अशा देशातही पुस्तकं उपलब्ध करून देण्यासाठी वाचनालयासारखी दुसरी संस्था नाही. किंबहुना जेवढी जास्त पुस्तकं विकत घेतली जातात, तेवढी वाचनालयासारख्या सोयींची अधिकच गरज वाढत जाते. जसे, भूक जेवढी शमवावी तेवढी प्रज्वलीत होते तसे !

या शाळेतील मुले आपल्या देशातील इतर कोणत्याही शाळेतील मुलांपेक्षा अधिक सुदैवी आहेत. त्यांचे ग्रंथालय खूपच समृद्ध आहे.

मोफत वाचनालयांचं देशभर जाळं तयार करण्याचं उद्दिष्ट, अति प्रगत देशांनी स्वत:पुढे ठेवलं आहे. इंग्लंडसारख्या काही देशांनी तर ते साधलंच आहे ! इ. स. १९७६ साली इंग्लंड व वेल्समध्ये सार्वजनिक वाचनालयातून, वाचण्यासाठी नेलेल्या पुस्तकांचे प्रमाण, सरासरी दरडोई ११.४ पुस्तकं येवढं पडतं. तर तेच प्रमाण स्कॉटलंड व उत्तर आयर्लंडमध्ये अनुक्रमे ९.४ व ६.६ असं आहे. १९७६ साली सोव्हिएट युनियनमध्ये (रशियात) ३,६०,००० येवढी वाचनालये होती. म्हणजेच, अंदाजे लोकसंख्येच्या दर हजारी एक वाचनालय ! एकूण ३०० दशलक्ष लोकसंख्येतील १८० दशलक्ष लोक वाचनालयाचा फायदा घेतात. ह्या दोन्ही देशात, वाचनालयाची सोय संपूर्णपणे मोफत आहे.

भारतानेही असंच उद्दिष्ट ठेवलं आहे पण ते गाठायला बराच लांबचा पल्ला मारावा लागेल. आपला देश खूप मोठा, गरीब व खूप लोकसंख्या असलेला आहे. सर्व लोकांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळवून देणे आणि देशांतील सर्व मुलांना कमीत कमी प्राथमिक शिक्षण देणं, ही जास्त निकडीची कामे आपल्याला अगोदर पुरी करायची आहेत. देशभर वाचनालयाची सोय करणं, हे अनेक आवश्यक कामातील एक काम होऊ शकतं !

केंद्र व राज्य सरकारांपुढे इतर अनेक समस्या असल्यामुळे, त्यांच्याकडून वाचनालयासाठी पुरेसा वेळ व पैसा आपल्याला हवा त्या प्रमाणांवर उपलब्ध व्हावा ही अपेक्षा करणं, निदान काही वर्षं तरी वाजवी वाटत नाही. अशा परिस्थितीत पुस्तकांच्या आवश्यकतेवर नितांत विश्वास असणाऱ्यांनीच पुढे येऊन समाजाला ही मदत करणें जरुरीचे ठरेल.

मग आपण काय करू शकतो ?—तर तुम्ही शाळेत असा—नाही तर ऑफिसांत असा—किंवा घरी असा—तुम्ही स्वत:च ह्या गोष्टींची सुरुवात केली

कलकत्ता येथील नॅशनल लायब्ररीतील मध्यवर्ती सभागृह. भारतातील हे एक मुख्य ग्रंथालय आहे. भारतात प्रसिद्ध झालेले प्रत्येक पुस्तक या ग्रंथालयात पाठवलेच पाहिजे, असा कायदा आहे. अशाच प्रकारची दुसरी दोन ग्रंथालये : सेंट्रल लायब्ररी, मुंबई व कन्निमारा लायब्ररी, मद्रास.

पाहिजे. ज्या शाळेत अशी वाचनालये नाहीत किंवा असलेली वाचनालये नीट चालत नाहीत, अशा ठिकाणी विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी एकत्र येऊन, वाचनालये स्थापावीत किंवा असलेली वाचनालये नीट व सुरळीत कशी चालतील ह्याकडे लक्ष द्यावे.

आपल्या राहात्या ठिकाणी एकत्र येऊन, लहान मुलांसाठी व प्रौढांसाठी, औपचारिक किंवा अनौपचारिक, वाचनालये व पुस्तकं उसनी देणाऱ्या छोट्या छोट्या संस्था स्थापण्याचा उपक्रम सुरू केला पाहिजे. आपल्या देशात, कित्येक भागात हे असे उपक्रम सुरू झालेले आहेत, आणि आपण त्यांत लक्ष घातलं तर, त्याची व्याप्ती इतर भागातही वाढवणं शक्य होईल.

पण वाचनालयासाठी विविध विषयांवरच्या पुस्तकांच्या नियमित पुरवठ्याची जरूरी आहे. मी पूर्वी म्हटल्याप्रमाणे, देशी भाषेतल्या पुस्तकांच्या बाबतीत ही एक मोठी उणीव आहे. पाठ्यपुस्तके सोडल्यास, बालवाचकांसाठी भारतात बालवाङ्मय फारच थोडे प्रकाशित होते. एवढेच काय, प्रौढांसाठी देखील, देशी भाषेत वेगवेगळ्या विषयांवरची पुस्तकं फारच मर्यादित आहेत. असे नेहमी दिसून येते की, मागणीप्रमाणे पुरवठा होतो. आपल्याजवळ तऱ्हेतऱ्हेची पुस्तकं पुरेशी नाहीत, ह्याचं कारण अशा पुस्तकांना मागणीच नाही, हे होय ! नॅशनल बुक ट्रस्टचे माजी अध्यक्ष प्रो. एस्. गोपाल, ह्यांनी एकदा आपल्या भाषणात असं म्हटलं होतं की पुस्तकभुकेने लोकांना ग्रासले आहे की नाही हे मला निश्चित सांगता येणार नाही. पण एवढं मात्र नक्की की, आपल्याकडे पुस्तकांचा दुष्काळ आहे, व आपल्याजवळ पुरेशी पुस्तकं नाहीत. त्यांचा अनुच्चारित व अनुत्तरित राहिलेला प्रश्न असा की, आपल्याजवळ फारच थोडी पुस्तकं आहेत, ती आपल्याला अधिक पुस्तकच नको म्हणून की अशा अधिक पुस्तकांची आपल्याला भूकच नाही म्हणून ?

आणि तुमचं उत्तर काय असेल ?